| | |
|---|---|
| MHKO180002252026 | **<u>संक्षीप्त फौजदारी खटला क्र.१०८/२०२६</u>**<br>महाराष्ट्र सरकार<br>**<u>विरुद्ध</u>**<br>तनवीर गुलाब मुजावर |

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुरूंदवाड यांचे न्यायालयात</u>**

( पिठासीन अधिकारी : व्ही. आर. माने)

कुरूंदवाड पोलीस ठाणे, कोल्हापूर गु.र.क्र.३४८/२०२५ तारीख ०९/१०/२०२५.
(आरोप - महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५-ई अन्वये.)

**<u>नि.क्र.१०/ब.</u>**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार तर्फे प्रभारी पोलीस अधिकारी<br>कुरूंदवाड पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर. |

| | |
|---|---|
| अभियोग पक्षातर्फे :- | विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्री. सुर्यकांत मिरजे |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी** | | तनवीर गुलाब मुजावर<br>वय : ५० वर्षे, धंदा : व्यापार,<br>राहणार: मुजावर गल्ली, शिरढोण, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. |

| | |
|---|---|
| आरोपी तर्फे विद्वान विधीज्ञ :- | श्री. एस. डी. पाटील |

| | |
|---|---|
| **गुन्हा घडला तारीख** | ०९/१०/२०२५ |
| **प्रथम खबर तारीख** | ०९/१०/२०२५ |
| **दोषारोपपत्र दाखल तारीख** | २२/०४/२०२६ |
| **दोषारोप ठेवल्याची तारीख** | ०२/०७/२०२६ |
| **पुरावा सुरू झाल्याची तारीख** | ०६/०८/२०२६ |
| **न्यायनिर्णय आरक्षीत केल्याची तारीख** | --- |
| **न्यायनिर्णय जाहीर तारीख** | १२/०८/२०२६ |
| **शिक्षा झाली असल्यास, त्याची तारीख.** | --- |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनाची तारीख | दोषारोप | शिक्षा झाली अथवा निर्दोष मुक्त केले | शिक्षा | फो.प्र.सं. कलम ४२८ अंतर्गत प्रकरणाच्या सुणावनीदरम्यान कोठडीत व्यतित केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | तनवीर गुलाब मुजावर | भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५(३) प्रमाणे नोटीस | ०२/०७/२०२६ | महा. दारुबंदी अधिनियम कलम ६५-ई. | आरोपी निर्दोष मुक्त | -- | -- |

## अभियोग पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदार क्रमांक | नांव | साक्षीदाराचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी, पोलीस, तज्ञ, वैद्यकीय, पंच, स्वतंत्र साक्षीदार) |
|---|---|---|
| १ | मोहन शांतीनाथ माणगांवे | पंच साक्षीदार |

**बचाव पक्षाचे अथवा न्यायालयीन साक्षीदार : काही नाही.**

## अभियोग पक्षातर्फे निशाणी यादी

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | ०९ | पंचनामावरील पंचाची सही |

**बचाव पक्षाचे/न्यायालयाचे/वस्तू निशाणी यादी : काही नाही.**

## न्यायनिर्णय

( जाहीर दिनांक १२ ऑगस्ट २०२६ )

आरोपी हा महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमच्या कलम ६५(ई) नुसारच्या अपराधासाठी संपरीक्षाधिन आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की :-**

०२. दि.०९/१०/२०२५ रोजी दुपारी ०४.१५ वा. शिराढोण, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील मुजावर गल्लीमध्ये आरोपी त्याचे पडीक घरामध्ये अवैधपणे, बेकायदा, विनापरवाना त्याच्या ताब्यात देशी दारु जीएम डॉक्टरच्या ९० मिलीच्या ३५

बाटल्या दारु विक्रीचे उद्देशाने बाळगून असताना फिर्यादी एस. एन. माने, पोलीस कॉन्स्टेबल यांना मिळून आला. सबब, फिर्यादीने आरोपीविरुद्ध फिर्याद दिली.

०३. सदर फिर्याद नुसार आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये गुन्हा क्र.३४८/२०२५ नोंदवण्यात आला. तपासी अधिकारी पोलीस हेड कॉन्स्टेबल ए. बी. चव्हाण यांनी गुन्ह्याचा तपास करुन आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपीवर नि.०७ प्रमाणे दोषारोप निश्चित करुन ते आरोपीला वाचून व समजून सांगीतले असता आरोपीने सदर दोषारोप नाकारुन संपरीक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाने एक पंच साक्षीदार मोहन शांतीनाथ माणगांवे यांना तपासले. सदर पंचाने अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. अभियोग पक्षाने बरेच प्रयत्न करुनही इतर साक्षीदार साक्षीसाठी उपस्थित राहीले नाहीत. तसेच, अभिलेखावर रासायनीक पृथक्करण अहवाल नाही. सबब, अभियोग पक्षाचा पुरावा नि.१ खाली आदेश पारीत करुन बंद करण्यात आला. अभिलेखावर आरोपीविरुद्ध दोषदर्शक पुरावा आला नसल्याने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ अन्वये निवेदन नोंदवलेले नाही.

०५. उभयतांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाच्या आरोपांवरुन खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले आहेत. सदर मुद्यांवर निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०९/१०/२०२५ रोजी दुपारी ०४.१५ वा. शिराढोण, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील मुजावर गल्लीमध्ये आरोपी त्याचे पडीक घरामध्ये अवैधपणे, बेकायदा, विनापरवाना देशी दारु विक्रीकरीता कब्जात बाळगून असल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले काय? | ...नकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त केले. |

## कारणमिमांसा

०६. अभियोग पक्षाला ही बाब संशयाचे पलिकडे शाबीत करणे आवश्यक आहे की, आरोपी हा त्याच्या पडीक घरामध्ये विनापरवाना व अवैधपणे दारुच्या बाटल्या विक्रीच्या उद्देशाने बाळगून असताना मिळून आला.

**मुद्दा क्र.१ व २ करीता :-**

०७. प्रस्तुत प्रकरणी अभियोग पक्षाचा पंच साक्षीदार मोहन शांतीनाथ मानगांवे याने त्याच्या पुराव्यात दि.०९/१०/२०२५ रोजी कुरूंदवाड पोलीस ठाण्याच्या पोलीसांनी त्याला कोठेही बोलवले नव्हते व तो देखील त्यांच्यासोबत कोठे गेला नव्हता असे सांगितले आहे. त्याच्यासमक्ष जप्तीची कारवाई झाली नसल्याचे सांगून त्याने पंचनाम्यावरील त्याची सही मान्य केली मात्र मजकुराबाबत काही माहिती नसल्याचे सांगितले. पंच साक्षीदार अभियोग पक्षास मदत करत नसल्यामुळे त्याचा उलटतपास घेण्यात आला उलटतपासात देखील साक्षीदाराने पोलीसांनी त्याच्या समक्ष पंचनामा तयार करुन मुद्देमाल जप्त केल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे.

०८. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन करता पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याने त्यांची साक्ष अभियोग पक्षास उपयोगी ठरत नाही. तथापि, अभियोग पक्षाने फिर्यादी, तपासी अधिकारी वा इतर साक्षीदार तपासले नाहीत. त्यामुळे फिर्याद शाबित झालेली नाही. आरोपी त्याच्या कब्जामध्ये विक्रीच्या उद्देशाने दारु बाळगून होता हे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५-ई खालील गुन्हा शाबीत करण्यासाठी महत्वाचे व आवश्यक घटक असल्याने आरोपीकडून आढळलेले द्रव्य हे दारुच होते हे शाबीत होणे आवश्यक आहे. मात्र, जप्त मुद्देमालाचा रासायनिक पृथक्करण अहवाल अभिलेखावर नसल्यामुळे जप्त मुद्देमाल दारु होती हे देखील सिध्द झालेले नाही. सबब वरील सर्व तथ्थ, परिस्थीती व एकूण पुरावा यांचे अवलोकन केले असता आरोपी विनापरवाना बेकायदेशीरपणे देशी दारु त्याचे कब्जात बाळगून त्याची विक्री करत असल्याचे सिद्ध करण्यात अभियोग पक्ष अयशस्वी ठरला आहे. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करिता</u> :-**

०९. आरोपी त्याचे कब्जात विना परवाना दारु विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगून होता हे आरोप सिध्द झाले नसलेमुळे आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. प्रस्तुत कामातील जप्त मुद्देमाल देशी दारु जीएम डॉक्टरच्या ९० मिलीच्या ३५ बाटल्यांची अपिल कालावधीनंतर योग्य ती निर्गत करणे योग्य होईल. सबब मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. आरोपी तनवीर गुलाब मुजावर यास महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये असलेल्या आरोपातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी अपिल कालावधीकरीता रक्कम रु.१५,०००/- चा नविन वैयक्तीक बंधपत्र व जामीनबंधपत्र द्यावे.

४. जप्त मुद्देमाल देशी दारु जीएम डॉक्टरच्या ९० मिलीच्या ३५ बाटल्या अपिल कालावधीनंतर नाश करणे करीता राज्य उत्पादन शुल्क विभाग, कोल्हापूर यांचेकडे पाठविण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MANE VAISHNAVI ROHAN
Date: 2026.08.12 16:39:07 +0530

ठिकाण: कुरूंदवाड.
दिनांक : १२/०८/२०२६.

( व्ही. आर. माने )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुरूंदवाड.